# ना. वा. टिळकांची कविता

• सोमनाथ कोमरपंत

नारायण वामन टिळक हे केशवसुतांचे समकालीन कवी, मराठीतील एक समर्थ कवी म्हणून ते गणले जातात. 'सौंदर्यवादी कवी' अशी त्यांची मराठी काव्यविश्वात प्रतिमा आहे. सौंदर्यवादी कवी वस्तुनिष्ठ वर्णनापेक्षा स्वतःच्या मनःस्थितीचे वर्णन अधिक करतो. सृष्टीतील सचेतन व अचेतन वस्तूंना मानवी व्यक्तित्वाने नटलेल्या रुपात पाहणे किंवा त्यांचा प्रतीकात्मक उपयोग करून मानवी भावनांचा परिपोष करणे, सौंदर्यानुभूती व प्रीतिभावना यांसारख्या आंतरिक गूढ भावनांचा साक्षात्कार निसर्गसृष्टीत प्राप्त करून घेणे या गोष्टी सर्वसामान्यतः त्याच्या बाबतीत संभवतात. नवीन युगातील कवींची निसर्गाकडे पाहण्याची ही अभिनव दृष्टी होय. इंग्रजी कवितेच्या अभ्यासामुळे वस्तुनिष्ठ कवितेकडून आत्मनिष्ठ कवितेकडे मराठी कवितेचा प्रवास होत होता. याच कालखंडात टिळकांची कविता विकसित झाली.

ना. वा. टिळक हे केशवसुतांहून एका वर्षाने मोठे होते. नागपूरला दोघांचा परिचयही झाला होता. काव्यनिर्मितीविषयी त्या दोघांची चर्चा चालत असे. त्यांचे साहचर्य आणि परस्परांची देवाणघेवाण आधुनिक मराठी कवितेला उपकारक ठरली. त्याविषयी प्रा. मं. वि. राजाध्यक्ष म्हणतात, 'टिळकांच्या सहवासात केशवसुतांच्या काव्यशक्तीला विशेष उत्तेजन मिळाले असे म्हणतात. पण त्यापूर्वी टिळकांनी लिहिलेली कविता संस्कृत भाषेतील अथवा जुन्या थाटाची होती. केशवसुत व त्यांचे काव्य यांचा परिचय झाल्यावर टिळकांनी नवा थाट आणला, म्हणून काव्यातील वडीलकी केशवसुतांकडे दिली जाते' (पाच कवी/पृ. ७८) केशवसुतांविषयी ना. वा. टिळकांच्या अंतःकरणात प्रेमादराची भावना होती. त्यांच्या 'केशवसुत' 'झपूर्झा गडे झपूर्झा' आणि 'कविरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले' या केशवसुतांवरील कवितांतून ती व्यक्त झालेली आहे.

..... अक्षयतेच्या पैलतिरीं ।
बसून आता ताल धरी
या तर मग या । कविता गाया
कृष्णाने जी शिकविली ।
दाव गाऊन ती सगळी
झपूर्झा ! गडे झपूर्झा !
(झपूर्झा गडे झपूर्झा)

मित्राविषयीचा कृतज्ञताभाव आणि जाणवणारी विरहव्यथा त्यांच्या पद्यांत उद्गारात एकवटलेली आहे.

जे जे काही दिसत मजला
भूतली व्योममार्गी,
तें तें सारें दिसत मजला
आज मित्रा अभागी,
भाषा ह्याची विशद करूनी
कोण आतां कथील ?
आतां ह्याला तुजविण कवी
कोणता गौरवील ?
(कवीरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले)

ना. वा. टिळक यांच्या कवितेचे स्वरूप पाहता जीवनानुभवांची विविध रुपे तीत प्रकटलेली दिसतात. प्रा. राजाध्यक्षांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची काव्य रचना जुन्या धाटणीची वाटते खरी, पण उत्तरोत्तर ही कविता नव्या संवेदनशीलतेशी संवाद साधताना दिसते. काही ठिकाणी तिचा सहजसुलभ आविष्कार मनात प्रसन्नता निर्माण करतो. उदा.

.... रंग नभाचे कसे तरी,
कसे तरी ही मजा खरी.
किती आपुली
फुलें उमलली,
कुठे लटकली,
चित्ता नच ही वेलीला
सुंदरतेची ही लीला
(कवीची विनवणी)

त्यांची कविता कधी तत्वचिंतनात रमते, तर कधी निसर्गचित्रणात रमते. निसर्ग हा त्यांच्या भावनाविष्काराला चेतना देणारा महत्वाचा घटक आहे. कौटुंबिक जिव्हाळ्याने त्यांची कविता ओथंबलेली आहे. आंतरिक प्रेमाच्या छटा ते तन्मयतेने रंगवितात त्यामुळे त्यांची प्रेमकविता मनोज्ञ स्वरूपाची झालेली आहे. त्यांच्या आस्तिक्यबुद्धीचे दर्शन त्यांच्या काही कवितांमधून घडते. केशवसुतांप्रमाणेच समाज-सुधारणेची तळमळ त्यांच्या काही कवितांतून व्यक्त झालेली आहे. पण त्यांचा हा स्वर क्षीणबल वाटतो. त्यांचा मनःपिंड अशा स्वरूपाच्या कविता लिहिण्यास पोषक नव्हता हे जाणवते. त्यांची कविता मानवतावादाचा पुरस्कार करते. त्यानी पुढे ख्रिस्ती धर्म स्वीकारला. तरी 'धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे' असे ते म्हणत असत. त्यांच्या कवितांतूनही त्या भावनांचे प्रतिबिंब पडलेले आहे. उदा.

रडेन मी बा झुरेन मित्रा
श्रमेन राहित लोकीं
मरेन अपुल्या देशासाठी
ख्रिस्ती जरि झालों की

मराठी परंपरेचा अभिमान त्यांच्या काही कवितांतून व्यक्त झालेला आहे.

'वनवासी' फूल' सारखी ४०० ओळींची प्रदीर्घ रचना त्यानी केलेली आहे. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यामधील आंतरिक संघर्ष कवी आणि निर्जन वनातील एक फूल यांच्या संवादरूपातून कवीने रंगविला आहे.

कवी हे प्रवृत्तीचे प्रतीक, फूल हे निवृत्तीचे प्रतीक. या दोहोंच्या संवादामधील तात्विकता मनांत ठसत असली तरी कवीची भावगंभरता लोप पावत नाही.

'वनवासी फूल' मधील फुलाची फुलाची विरक्ती नाहीशी व्हावी. अनुरक्ती निर्माण व्हावी, कवी नाना परीनी फुलाला विनवितो.

जीवन आणि प्रेम भिन्न नसून एकच आहेत. प्रेमाभाव ही माती आहे. तो केवळ स्वार्थाचा अतिरेक. प्रेमासाठी सुखाला विसरणे हीच सुखाची पूर्ती, प्रेमासाठी देहविसर्जन करणे हीच खरोखर मुक्ती असे प्रेमविषयक तत्वज्ञान कवी सांगतो.

ना. वा. टिळक याना आयुष्यभर भ्रमंती करावी लागली. प्रतिकूल परिस्थितीचे चटके सहन करावे लागले

अलिप्तता ही व्यामिश्र जगाच्या कटू अनुभवांतून निर्माण झालेली आहे. आपले अनाघ्रात शरीर मोहवश जगाने चिरडू नये असे त्याला वाटते. उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातूनच जग दुसऱ्याकडे पाहत असते असे फुलाला वाटते. या स्वार्थाने बरबटलेल्या जगाच्या प्रवृत्तीवर मर्मस्पर्शी भाष्य करताना फूल उद्गारते,

.... विचार तैसा उच्चारांचा
प्रवाह कोठे वाहे ?
उच्चारांसम आचारांची
श्रेणी कोठे आहे ?
मनांत भलते, जनांत भलते
हा तुमचा व्यवहार

मी प्रफुल्ल असले अथवा म्लान असले तरी जगदात्म्याला सारखेच प्रिय आहे, असे फूल सांगते. वनात राहणे, एकाकी राहणे हे माझे दुर्दैव आहे असे तुला वाटत असेल, पण त्यातच माझ्या जीवनाची सार्थकता आहे, तेच माझे सौभाग्य आहे, असेही ते फूल सांगते.

कवी उद्गारतो, 'हे फुला, तुला जगाचा अनुभव नाही म्हणून तुझी व्यर्थ बडबड चाललेली आहे. तुझी शुद्ध सुखाची आशा खोटी आहे.ते केवळ जनांत अथवा विजनात नसते. हे तुझे बोल खोटे आहेत. तू तुझ्या गुरूला जाऊन विचार.

तहानेवाचून पाण्याला मोल नाही. भुकेवाचून अन्नाला मोल नाही. उष्ण्यावाचून चंदनाला मोल नाही. या करिता दुःखावाचून सुखाची कल्पना करता येत नाही.'

पण स्वतः अनुभवलेल्या कटुतेचा स्पर्श त्यानी आपल्या कवितेला होऊ दिला नाही. त्यांच्या भावसमृद्ध मनाचा प्रत्यय त्यांच्या कवितेतून येतो. 'माझी भार्या' मध्ये सहजीवनातील प्रसन्नतेचे सारे श्रेय त्यानी आपल्या पत्नीला देऊन टाकलेले आहे. एवढेच नव्हे तर गृहजीवनातील शुभाशुभाची निर्णायक शक्ती या नात्याने ती त्याना भेटते. ते उद्गारतात.

नमीतो मातेला—
जगत गणिते दैवत तिला,
नमीतो कांतेला—
नृपपद उणे जीस तिजला
नमीतो मैत्रीला—
परगृहगताही भगिनीला,
नमीतो कन्येला—
सतनु ममता तीच विमला

आपल्या अंतःकरणातील प्रीति-भावनेचा मनमोकळा आविष्कार करायला त्यांचे मन संकोचत नाही. 'माझ्या प्रिय सखिस मी प्राण गणितो' ही अद्वैताची भावना त्यानी व्यक्त केली आहे.

'माझी भार्या' मधील नायक आपल्या पत्नीच्या अंगप्रत्यंगाच्या सौंदर्यामुळे तिच्यावर भाळलेला नसून तिचा साधेपणाच त्याला भावलेला आहे. स्वभावोक्ती साधी म्हणून अलंकारांत सरस ठरते त्याप्रमाणे प्रिया साधी म्हणून त्याला ती स्वर्गासारखी भासते. तिची वाणी साधी म्हणून ती अधिक मधुर वाटते. तिची रहाणी साधी म्हणून त्याचा जीव भुलतो. तिच्या आंतरिक सौंदर्याचे वर्णन करताना कवी म्हणतो

... जिच्या लावण्याने
तम दुर पळे, चित्त उजळे,
उषेच्या लावण्ये
जगत उजळे जेवि सगळे
असो काळी गोरी
त्रिभुवनी तिचे रूप वहिले
निळे वा गोरे वा
मज पुरवले रत्न असले

तिच्या सहवासात कवीचे आंतरविश्व उमलून कसे येते त्याचा नितांतरमणीय आविष्कार खालील ओळीत दिसून येतो

... प्रिया माझी गाते
मग सकल हे विश्व डुलते
अहा अंतःसृष्टी
हसत सुटते ! पूर्ण फुलते !

प्रेमातील अद्वैतभाव कवीने

.... रुप निराळे, नाम निराळे
अभिन्न उभये परी
(अगाध काहीतरी !)

या ओळीतूनही व्यक्त केला आहे.

'कुणास्तव कुणीतरी' हीसुद्धा रुचिर आणि उत्कट भावनांनी युक्त कविता आहे. प्रेमभावनेतील पर्युत्सुकता, जिव्हाळा व अभिजात शृंगार इ. छटा या कवितेत आढळतात, 'मानिनीचे वेडेपण', 'विरह', 'शुद्ध प्रेम आणि वियोग' आणि 'आवड आणि प्रेम' याही त्यांच्या उल्लेखनीय प्रेमकविता आहेत.

खऱ्या प्रेमाला बंधन नाही. प्रीती मनुष्याला दुष्कर्मापासून परावृत्त करून सन्मार्गाला लावते, त्याला कार्यक्षम बनविते. त्याला अनंत ईश्वरापर्यंत नेऊन पोचविते. प्रेमाला मरण नाही. ते अजरामर आहे, असे कवी उद्गारतो.

'आंधळा झालो तर—' सारख्या कवितेतून ना. वा. टिळकांची चिंतनशील वृत्ती व आत्मनिष्ठा यांचे दर्शन घडते. 'नेत्रे इष्ट मला, परंतु नच ते नेत्रावलंबी मन' असे म्हणणाऱ्या कवीला जीवनातील चिरंतन सौंदर्याचे दर्शन घडायला केवळ लौकिक दृष्टी असून चालत नाही असे वाटते. साक्षात्कारी अनुभूतीचा स्पर्श हवा असे वाटते. त्यामुळेच

.....जरी नेत्रे गेली तरि
अनृती काय सरली ?
जरी नेत्रेगेली तरी
मती मला का विसरली ?
जरी नेत्रे गेली तरी
हृदय हे का हरपले ?
जरी नेत्रे गेली तरी
अशुभ ते काय घडले ?

ही आत्मनिर्भर वृत्ती कवीच्या अंतरंगात वसत आहे. आपल्या मनाशी संवाद करताना कवी उद्गारतो,

'.....डोळे नसल्यामुळे तुला अमर्याद सृष्टी दिसणार नाही. पण आजवरच्या माझ्या सुखदुःखांशी समरस झालेली नव्या सृष्टीची निर्मिती— माझी काव्यशक्ती आंधळेपणीच मला कशी टाकून देणार ? ती नित्यनूतन सौंदर्य विलासांचे दर्शन घडवीत राहणार. नवे समाधान प्राप्त करून देणार. अंतःप्रेरणा व काव्यशक्तीवरील विश्वास कवीच्या अंतःकरणात वास करतात. श्रद्धेय भावनेचा दृढतंतू हाही त्यांच्या या कवितेचा लक्षणीय विशेष आहे. ईश्वराला उद्देशून कवी म्हणतो

.... अनेक विध दर्शनी
मन चळे तुम्यापासूनी,
म्हणून जग चितिते
तुज विलोचना झांकुनी
बघेन तुजलाच मी
सतत बंध झालो तरी,
नकोत भयने ! प्रभो
वसति मन्मनी तूं करी !

एकीकडे केशवसुतांसारखा कवी 'देव दानवां नरे निर्मिले' या प्रक्षोभक विचाराने समाजमनाची झोप उडवित होता तर दुसरीकडे त्यांचा समकालीन कवी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील नवविचारांशी संपर्क होऊनही ईश्वरवादी दृष्टीकोन जोपासताना दिसतो. विविध विचारांच्या मंथनाचा हा कालखंड होता. या अंतर्विरोधी धारांचे मराठी कवितेतून घडणारे हे दर्शन आहे.

'पुरे जाणतो मीच माझे बल !' ही कविता चिंतनशील वृत्तीतून साकारलेली कविता आहे. तिचा अंतःसूर आत्मलेखनाचा आहे. आपल्या सामर्थ्याचे आणि मर्यादांचे अचूक भान असलेल्या प्रगल्भ कविमनाचे दर्शन या कवितेतून घडते.

.... मी भासतो कीट
ही भूमि माझी परी
भेदि सूर्याचिया मंडळा,
तू हास काला मला
मी तुलाही सदा
हांसतो, गर्विता, चंचला.

दुर्दम्य सामर्थ्याची जाणीव पुढील ओळींत प्रभावीपणे व्यक्त होते.

... हे विश्व सारे विहारास माझ्या
पुरेसे न होईल शंका नसे
.... भूगोल हा दोन बोटांत माझ्या
नको अंतराला तुझी थोरवी
.... मी ओळखीले मला पूर्ण
आता कशाला मला पाहणे आरसे ?

'ब्राम्हण किंवा महार' ही प्रागतिक विचारसरणीचा पुरस्कार करणारी कविता. समाजमंथनाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या नवविचारांची दिशा दाखविणारी ही कविता. केशवसुतांच्या

ब्राम्हण नाही हिंदुही नाही न मी एक पंथाचा

या विचारसरणीशी या कवितेतील भावनाशयाशी काहीसे साम्य आढळते.

.....मी ब्राम्हण वा महार मी गणी न कवणालाचकमी ..मी ब्राम्हण वा महार मी
गणी न कवणालाच कमी

असे कवी उद्गारतो. 'जन्मभूमि-सेवाधर्म' या पालुपदामुळे मातृभूमीच्या सुखदुःखांशी ती निगडित आहे.

विचारांची उदात्तता अगम्य दर्शन भावप्रेरकतेची उत्कटता या ओळीत आढळत नाही. 'रणशिंग' या कवितेच्या भावनाशयाच्या बाबतीत हेच म्हणता येईल. एवढे मात्र खरे की अवतीभोवतीचे त्यातील विसंवाद आणि रुढीग्रस्त समाज याविषयीच्या भावनात्मक प्रतिक्रिया कवीला व्यक्त कराव्याशा वाटल्या.

'सृष्टीची भाऊबीज', 'बाहयसृष्टीचे आणि अंतःसृष्टीचे गायनवादन', 'सृष्टीची करमणूकीची घटका' आणि 'पर्वतारोहण' इ. त्यांच्या निसर्गविषयक कविता आहेत. टिळकानी सृष्टीला आप्त मानले. तिच्या सान्निध्यात त्यांची चित्तवृत्ती उमलत असे. याच्या अनेक खाणाखुणा त्यांच्या या कवितात आढळतात. सृष्टीविषयीचा आत्मीय भाव 'सृष्टीची भाऊबीज' या दीर्घ कवितेत व्यक्त झाला आहे. मनातील उत्फुल्लता कवी पुढील शब्दांत व्यक्त करतो.

.... हर्षा नाहि मिती,
खरोखर, हर्षा नाहि मिती
हे कपोत, केकी नर्तन करिती
ताल झरे धरिती !
नवी फुले फुलती,
वसंती, नवी फुले फुलती,
(सृष्टीची करमणूकीची घटका)

ना. वा. टिळक हे 'फुलामुलांचे कवी' म्हणून ओळखले जातात. हे नाव सार्थ करणाऱ्या त्यांच्या 'रानांत एकटेच पडलेले फूल', 'गुलाब', 'दोन फुले', 'माझी ताई', 'मुलीच्या वाढदिवसाला अनुलक्षून बापाचे उद्गार' आणि 'विरह फुलाचा नाहि बरा' या कविता आहेत.

सनातन वात्सल्यभावनेचे नाजूक चित्रण करणाऱ्या 'केवढे हे क्रौर्य !' आणि 'पांखरा ! येशिला का परतुन?' या कविता मराठी काव्यसृष्टीतील उल्लेखनीय कविता आहेत त्यातील आर्तता रसिकाच्या अंतःकरणात भावनांचे कल्लोळ निर्माण करते.

केशवसुत, बालकवी या मराठीतील श्रेष्ठ कवींशी त्यांचा संपर्क आला. बालकवींना तर त्यानी पित्याचे वात्सल्य दिले. या मनस्वी कवीच्या भ्रमंतीचे व आंतरिक प्रवृत्तीचे विलोभनीय चित्रण त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यानी 'स्मृतीचित्रे' मध्ये केले आहे. ना. वा. टिळकांच्या सान्निध्यात त्यांचेही भावजीवन बहरले. प्रसंगी दुःखाच्या अनंत कळा सहन करूनही अलिप्तपणे त्यानी सहजीवनाचे हे चित्र रेखाटले. अनलंकृत शैलीतील 'स्मृतिचित्रे' हा श्रेष्ठ नजराणा मराठी साहित्याला मिळाला.

ना. वा. टिळकांच्या कवितेतील सामर्थ्य व मर्यादा दाखविताना प्रा. कुसुमावती देशपांडे म्हणतात,—

'त्याना स्वतःला सृष्टीसतीचे बरेचसे मित्रत्व लाभले खरे. लडिवाळपणे ती त्यांच्याशी खेळली. फुलांचे सौंदर्य, चिमण्या पाखरांची भावसृष्टी यांचा त्यानी आपल्या काव्यात आविष्कार केला. मानवी जीवनातील काही समस्यांचे, विचार प्रवाहांचे भावगंभीरपणे विश्लेषण त्यानी केले. परंतु याच्यापलिकडे त्यांच्या प्रतिभेची भरारी गेली नाही.'
(कवींची काव्यदृष्टी/पासंग/पृ-३२)

ना. वा. टिळकांचे कवितेवर व कवीच्या जीवितकार्यावर नितांत श्रद्धा होती. प्रसन्न शैलीत त्यानी रसिकांना वेळोवेळी आवाहन केले आहे. 'कवीचे उद्यान' मध्ये कवी म्हणतो

कविच्या उद्यानाऐसे
नंदनवन तरी काय दिसे ?
मधु गंधाचे
मधुर रसाचे मंदरतेचे
निधान हे विश्रामाचे
सुखशांतीचे प्रेमाचे

ना. वा. टिळकांची भावनांची तार छेडणारी, चिंतनाला प्रवृत्त करणारी कविता हेही मराठी कवितेतील रमणीय आणि विश्रब्ध असे विश्रामधाम आहे.

## विविधतेतून एकता

(पान ५ वरून)

पुढे हा विदूषक सर्व स्थानिक भाषासाहित्यातून अवतरला असावा. आपल्याकडे आजही दशावतारी खेळ - काल्यातून हा विदूषक अनेक नावानी दिसतो. काही ठिकाणी हा विदूषक असतो तर काही ठिकाणी कोडांगी.

एकंदरीत भारतीय नाट्यपरंपरेचा विचार करताना सर्वत्र समान मूल्ये आपणास दिसतील. सामाजिक व्यंगावर टीका करता - करता माणसाला अभिरुचिसंपन्न बनविणे व सुशिक्षित व सुसंस्कारित करणे ही कामे भारतीय रंगभूमीने सदैव केलेली आहेत. सांस्कृतिक एकात्मकतेमुळेच हे शक्य होते.

भारतासारख्या खंडप्राय देशात विभिन्न जाती, धर्म, रुढी, परंपरा, प्रथा, भाषा, आचरणपद्धती असल्याने एकूण सामाजिक विकासाच्या बाबतीत कला हे अत्यंत महत्वाचे माध्यम ठरते. राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक एकात्मता असणे लागते. नपेक्षा सारे मुसळ केरात ही गत व्हायची. सांस्कृतिक विकासाशिवाय सामान्य विकास कधीच अर्थपूर्ण होऊ शकत नाही. भारतातील कोट्यवधी जनतेला आमच्या संपन्न सांस्कृतिक परंपरेची जाणीव करून देणे व हा अमोल वारसा जतन करण्याचे महत्व कळवून देण्याच्या उद्देशाने आपल्या देशात विविध सांस्कृतिक योजना कार्यान्वित केल्या जात आहेत. सा विभागीय सांस्कृतिक केंद्रांच्या स्थापनेची योजना हा त्यातलाच एक भाग आहे. कार्य संस्कृती संवर्धनासाठी कार्य करता लोकपरंपरा आणि लोककला लोकसमुदायामधील संस्कृती जतन भावना ही नैसर्गिक परिसरातून निका निघू नये याची पूर्ण जाणीव सतत अस आवश्यक असते. त्यामुळेच तर आज आपल्या विविधतेतून एकात्मता साधण अभिमानास्पद संस्कृतीचे आम्ही वारस आहेत हे सांगण्यास सार्थ अभिमान वाटतो

# गोमंतकातील नाट्यवेडाला विधायक वळण

• सुमेधा कामत

गोमंतक! कलाप्रिय गोमंतक! कलेच्या वेडात हरवलेला गोमंतक! चित्रकला, स्थापत्यकला, गानकला, नृत्यकला, नाट्यकला इत्यादि अनेक कलांच्या आसक्तीत गुरफटलेला गोमंतकातला प्रत्येक माणूस. येथल्या असा हा गोमंतक, नाट्यवेडासुद्धा! येथल्या प्रत्येक माणसाच्या ओठावर लकेर आहे, प्रत्येकाचा चेहरा बोलका आहे आणि प्रत्येकाला बोलताना! हातवारे करायचीसुद्धा 'वेडी' सवय आहे. गोमंतकाने आतापर्यंत अनेक नट रंगभूमीला दिले. हे अभिनेते जन्माला आले ते या भूमीत. पण त्याना पैलू पडले गेले ते मात्र गोमंतकाबाहेर!

या पार्श्वभूमीवर येथल्या नाट्यकला

लाईटिंग इत्यादि क्षेत्रात. चौदा वर्षे मी तिथंच राहयलो. वेगवेगळ्या प्रकारची नाटकं केली. वर्ल्ड थिएटरचा अनुभव मला तिथं मिळाला.

**कला अकादमीतील थिएटर फॅकल्टीचे स्वरूप काय आहे?**

त्यातले २१ जण आता येतायेत. त्यात तीन मुलींचा समावेश आहे. रोज संध्याकाळी ६.३० ते रात्री ९.३० अशी या अभ्यासक्रमाची वेळ आहे.

अभिनयाबरोबरच आम्ही विद्यार्थ्यांना थिएटर आर्किटेक्चर, सिनिक डिझाईन

त्याच्यावर पुरेसा प्रमाणात संस्कार झालेले नाहीत. प्रयत्न जेवढ्या प्रमाणात व्हायला पाहिजे होते तेवढ्या प्रमाणात झालेले नाहीत.

**तुमच्या तुकडीतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात तुमचा काय अनुभव?**

शिकवतात. त्याशिवाय व्हिजिटिंग फॅकल्टी पॅनल आहे. तसेच गोव्यातील नामवंत व त्या त्या क्षेत्रात विशेष प्राविण्य असलेल्या व्यक्ती आमच्या विद्यार्थ्यांना येथे मार्गदर्शन करण्यासाठी येतात. गोव्याबाहेरील व परदेशी तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले आहे. थिएटर आर्टसंबंधी १५ दिवसांचे एक शिबिरही आम्ही नुकतेच आयोजित केले होते. ग्रीक, रोमन, ग्लोब थिएटर, नाट्यमंडप तथा कुतम्पलम नाट्य मंडपाचे डिझाईन त्याद्वारे विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले.

**येथील नाट्यप्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यम - भाषा कोणत्या?**